**जिल्हाधिकारी लातुर यांचे कार्यालय**
**(पुरवठा विभाग)**

---

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील.**

---

**श्री.अनंत गोविंदराव पारसेवार**
**रा.गोविंदराज प्रिंटर्स,रेल्वेस्टेशनरोड,**
**उदगीर,जिल्हा लातुर** **अपिलार्थी**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अव्वल कारकुन,पुरवठा-६**
**जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,**
**लातुर** **उत्तरार्थी**

**अपील क्रमांक २०१२/पुवि/मा.अपिल/कावि/३१६**

अपिलार्थी श्री.अनंत गोविंदराव पारसेवार रा.उदगीर जिल्हा लातुर यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली दिनांक १७/२/२०१२ अन्वये मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नसल्याने या प्राधिकरणाकडे प्रथम अपिल दिनांक ३० मार्च २०१२ रोजी प्राप्त झाले.प्रकरणात सुनावणीची नोटीस दिनांक ३१/३/२०१२ रोजी अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी यांचे नांवे नोटीस काढण्यात येवुन प्रकरण दिनांक ११/४/२०१२ रोजी सुनावणीस ठेवण्यात आले.

दिनांक ११/४/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपिलार्थी यांचे नांवे पुकार करण्यात आला.
सुनावणीचे वेळी अपिलार्थी उपस्थीत राहीले नाहीत.जनमाहिती अधिकारी सुनावणीचे वेळी स्वतः उपस्थीत राहीले सुनावणीचे वेळी जनमाहिती अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की,अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती दिली नाही हे म्हणणे संयुक्तीक नाही.या संकलनाकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना दि.२२/३/२०१२ रोजीचे पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात आली आहे,

तसेच या कार्यालयाच्या स्थायी आदेश संचिकेमध्ये उपलब्ध असलेले शासन निर्णये,परिपत्रके अपिलार्थी यांना निरिक्षणासाठी उपलब्ध असले बाबत दिनांक २२/३/२०१२ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थी यांना कळविले असलेचे या प्राधीकरणास अवगत केले आहे.सदरील पत्राची प्रत अपिलार्थी यांना दिनांक २२/३/२०१२ रोजी देण्यात आली या पत्राची पोच जनमाहिती अधिकारी यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी प्राधिकरणासमोर केलेला युक्तीवाद व जनमाहिती अधिकारी यांचे संचिकेतील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचे दप्तरी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली असल्याचे दिसुन आले.वरिल बाबी विचारात घेता प्राधिकरण पूढील प्रमाणे आदेश देत आहे

## आदेश

१-अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना माहिती मिळाली असल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२-निम्नस्वाक्षरीत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे अपिलीय प्राधिकारी मा.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद हे असुन निर्णयाच्या दिनांकापासुन अपिलीय कालावधी (९०) दिवसांचा आहे.

स्थळ - लातुर

स्वाक्षरीत
अपिलीय अधिकारी
तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी
लातूर

दिनांक १६/४/२०१

अग्रेषित

१ - श्री.अनंत गोंविदराव पारसेवार, रा.गोंविदराज प्रिंटर्स,रेल्वेस्टेशनरोड,उदगीर,जिल्हा लातुर **(Under Posting Of Certificate पोस्टाचा दाखला घेवुन).**

२- जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन,पुरवठा-६जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,लातुर

३ जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी,लातुर यांना http:/Latur.nic.in.या संकेतस्थळावर upload करीता .

400

अपिलीय अधिकारी
तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी
लातुर.

दुरध्वनी क्रमांक :०२३८२-२४३२३४(पुरवठा) २४३५०६ फॅक्स: ०२३८२-२४२३३०
Email ID-dsolatur @ gmail.com.

**सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी तथा प्रथम अपिलीय प्रधिकारी यांच्या समोर महितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19(1) अन्वये दाखल झालेले अपिल .**

सहय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी
तथा प्रथम अपीलिय प्रधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, लातुर

**श्री अमोल मारोती तलवाडकर**
**रा क्रंतीनगर ,बनशेळकी रोड ,उदगीर जि.लातूर**

**विरूध्द**

**जनमाहिती अधिकारी तथा अ.का .कक्ष -6**
**जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय लातुर**

**विषय - माहिती अधिकार अधिनियम2005 चे कलम 19(1) अन्वये प्रथम अपील प्रकरणाचा थोडक्यात तपशिल .**

अपीलर्थी श्री अमोल मारोती तलवाडकर रा क्रंतीनगर ,बनशेळकी रोड उदगीर जि. लातुर यांनी जिल्हाधिकारी लातुर यांच्या कार्यालयातील पुरवठा विभागातील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक 18/4/2011 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 खालील नियमांतर्गत अर्ज देवुन खालील माहितीची मागणी केली

1. उदगीर शहरातील रॉकेल विक्रेत्याची यादी. 2) ऑक्टोब -2010 मध्ये रॉकेलचा दिलेला कोटा त्याची आकडेवारी व संबधित दुकानदराने माहे ऑक्टोबर 2010 वाटप केलेली रॉकेलचे युनिट रजिष्टरची छायांकीत प्रत 3. व तेथील तहसीलदार यांने शासनास सादर केलेल्या मासिक अहवाल प्रति मिळणे या तीन मुदया मधील नुमद माहिती उपल्बध करून देणेस दिनांक 18/04/2011 रोजी अर्जाद्वारे मागणी केली आहे. दिनांक 18.04.2011 रोजच्या माहिती अधिकारात मागणी केलेली माहिती न दिल्याने माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) अतंर्गत दिनांक 13.5.2011 रोजी या प्रधिकरणाकडे खालील मुद्यावर अपिल दाखल करण्यात आले आहे

1. माहिती न देवुन भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न केल्या बध्दल .
2. दिनांक 18.04. 2011 ची माहिती अधिकाराची माहिती त्वरीत माहिती मिळणे बाबत .

सदर प्रकरणात दिनांक 7.07.2011 रोजी नोटीस काढण्यात येवुन प्रकरण अतिम सुनावणीसाठी दिनांक 04.08.2011 रोजी ठेवण्यात आले सुनावणीच्या वेळी आपिलार्थी अनुपस्थीत , जनमाहिती अधिकारी स्वत: उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी त्यानी युक्तीवाद मांडला जनमाहिती अधिकारी यांनी त्याचे युक्तीवादामध्ये त्यांचे कार्यासनाकडे उपलब्ध असलेली माहिती आपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अर्जामधील मुद्या क्रं. 1व 2 बाबतची माहिती पत्र. क्रं. 2011/ पुवि / पुरवठा - 6 / कावी 436 दि. 05.05.2011 अन्वये उपलब्ध करून देण्यात आली आहे जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या अर्जा मधील मुद्या क्रं. 2 मधील

नमुद युनिट रजिष्टरची प्रत व  मुद्या क्र 3 मधील नमुद माहिती तहसीलदार उदगीर यांचे कार्यालयाचे कक्षेतील संबधित असल्याने दि 18.04.2011 रोजीच्या माहिती अर्जाची  प्रत तहसीलदार उदगीर यांना पाठवुन मुदा क्र 3. मधील माहिती तहसीलदार उदगीर यांनी संबधितास माहिती उपब्लध करून देणेस कळविले असल्याचे सुनावन्णीच्या वेळी जनमाहिती अधिकारी यांनीा प्रतिपादन केले तसेच तसेच 5.05.2011 रोजीच्या पत्रची प्रत्र सचिकेत समाविष्ट असल्याचे अवगत  केले. तसेच अर्जादराने दि 18.04.2011 रोजी महिती अधिकाराखाली दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने कार्यावाही पुर्ण झालेली असल्याने आपिलार्थी यांचे म्हणेने संयुक्तीक नाही असा युक्तीवाद केला .

आपिलार्थीचे  प्रथम अपीलावरून असे दिसुन येते की आपिलार्थी यांना विलंबाने महिती मिळाली आहे. तीही अपुर्ण मळाली  आहे,  तसेच मुद्या क्र 3 बाबत माहिती पुरविण्याचे पत्र तहसीलदार उदगीर यांना विहीत मुदतित न पाठविता विलंबाने दि 5.05.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांनी पाठवून नियमाचे पालन न केल्याचे दिसुन येते यास्तव आपिलार्थी याचा जनमाहिती अधिकारी याच्याकडे सादर केलेल्या दि 18.04.2011 मधील मुद्या क्रं. 2 मधील नमुद युनिट रजिष्टरची प्रत व  मुदा क्र 3 बाबतची  माहिती तहसीलदार यांनी तात्काळ विनामुल्य व नोदणीकृत टपालाने आपिलार्थी यांना उपलब्ध करून दयावी .

या पार्श्वभूमीवर प्रथम अपिल प्रधिकरणाचे आदेश खालील प्रमाणे आहेत

## <u>आदेश</u>

1. तहसीलदार उदगीर यांनी उपरोक्त नमुद केलेनुसार आपिलार्थी यांना विनामुल्य माहिती तात्काळ उपलब्ध करून दयावी .

2. निम्न स्वाक्षरीत प्रथम अपीलीय अधिकारी यांची अपिलीय प्राधिकारी राज्य माहिती आयुक्त खंडपीठ, औरंगाबाद हे असुन निर्णयाच्या दिनांक पासुन अपिलीय कालवधी 90 दिवसाचा आहे .

दि. 04.08.2011

**(पी.बी .पाटील )**
प्रथम अपिलीय प्राधिकारी, तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी.लातूर

**अग्रेषीत -**
1 . जन माहिती अधिकारी तथा अ.का .श्री गणेश सरवदे यांना नियमानुसार आवश्यक त्या  कार्यवाहीस्तव
2. श्री अमोल मारोती तलवाडकर रा क्रंतीनगर ,बनशेळकी रोड उदगीर (नोदणीकृत पत्राद्वारे )
3. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांना http:/latur.nic.in या संकेतस्थळावर uplod करिता
4. मा जिल्हाधिकारी लातूर / मा जिल्हा पुरवठा अधिकारी यांना महिती व योग्य त्या कार्यावास्तव .